**<u>गोपनीय</u>**

**क्रमांक : का.स./बैठक/२६३**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
<u>मुंबई - ४०० ०५१.</u>
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी झालेल्या २६३व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br><u>मुंबई — ४०० ०५३</u> | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, <u>मुंबई - ४०० ०२५.</u> | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, <u>मुंबई - ४०० ०२१.</u> | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br><u>मुंबई - ४०० ०३२.</u> | - | सदस्य |
| महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br><u>मुंबई - ४०० ००१.</u> | - | सदस्य |

..२/-

| | | |
|---|---|---|
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको,<br>निर्मल, नरीमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६३व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **०५ सप्टेंबर, २०१९ (गुरूवार)** |
| **वेळ** | : | **दुपारी ३.३० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. अजोय मेहता<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. प्रविण परदेशी<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका, | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| डॉ. नितीन करीर<br>अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |
| श्री. लोकेशचंद्र<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. मनोज सौनिक
प्रधान सचिव,
वित्त विभाग

डॉ. सोनिया सेठी
अतिरिक्त महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.एम.किडे
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. राजेंद्र गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सुगंधा पेदे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या २६२व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या २६२व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

..३/-

**बाब क्र.३ : <u>मुंबई मेट्रो मार्ग-९ (दहिसर ते मिरा भाईंदर) व मेट्रो मार्ग ७अ (अंधेरी (पूर्व) ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) या प्रकल्पाच्या स्थापत्य बांधकामासाठी ई-निविदेला मंजूरी देणेबाबत.</u>**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मेट्रोमार्ग ९ व ७ अ या प्रकल्पास प्राधिकरणाच्या दि. २९ मार्च, २०१७ रोजीच्या १४२ व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दि. ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत अंदाजित केलेल्या रु. ६६०७ कोटी मूळ किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यानुसार मेट्रो मार्ग ९ व ७अ साठी मे. दिल्ली मेट्रो रेल महामंडळ यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पासाठीच्या स्थापत्य कामांची रु. १६३८.१३ कोटी एवढ्या रक्कमेच्या स्थापत्य बांधकामाचे निविदा दस्तऐवज प्राधिकरणाच्या मेट्रो विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहेत.

३.२ अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी मेट्रो बृहत आराखड्यातील विविध मेट्रो मार्गांच्या अंमलबजावणी संबंधीची प्रगती व सद्यस्थितीची माहिती दिली. प्रस्तावीत प्रकल्पाची माहिती देतांना सांगितले की, मेट्रो मार्ग ७अ हा उन्नत तसेच भुयारी स्वरुपाचा असून पश्चिम द्रुतगती महामार्ग अंधेरी (पूर्व) येथून मेट्रो मार्ग ७ चे विस्तारीकरण NAD Colony विलेपार्ले पर्यंत उन्नत स्वरुपाचे असून त्यापुढे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत भुयारी स्वरुपाचे असणार आहे. तसेच, त्यात NAD Colony विलेपार्ले येथे उन्नत मेट्रो स्थानक व छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ येथे भुमिगत मेट्रो स्थानक प्रस्तावित आहे. पुढे मेट्रो मार्ग ९ ची व्याप्ती विशद करतांना सांगितले की, मेट्रो मार्ग ९ हे मेट्रो मार्ग ७ चे उत्तरेकडील विस्तारीकरण हे दहिसर (पूर्व) ते मीरा-भाईंदर या उन्नत मेट्रो मार्गाद्वारे प्रस्तावित आहे. या मेट्रो मार्गावर आठ उन्नत मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. या मेट्रो मार्गादरम्यान मीरा-भाईंदर क्षेत्रात दोन उड्डाणपुलांची उन्नत मेट्रो मार्गासोबत एकात्मिक उभारणी करण्यात येणार आहे.

३.३ प्रकल्पाच्या व्याप्तीच्या अनुषंगाने अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी अवगत केले की, सदरच्या मेट्रो मार्गामधील तांत्रिक जटीलता लक्षात घेता प्राधिकरणाच्या मेट्रो मार्ग ४ व मेट्रो मार्ग २ब चे सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) M/s . SYSTRA यांच्यामार्फत निविदेसाठीचे संरेखन काम करण्यात आले होते.

मेट्रो मार्ग ९ व ७अ (सी.ए.४८) चे स्थापत्य बांधकामाकरीता ई-निविदा मागविण्यासाठी "टाईम्स ग्रुप" च्या विविध इंग्रजी, मराठी व हिंदी दैनिक वृत्तपत्रात दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली व ती प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली होती. त्यानूसार निविदा पूर्व बैठक दिनांक १२ नोव्हेबर, २०१८ रोजी घेण्यात आली. निविदापूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

३.४ निविदा प्रक्रियेदरम्यान विविध मुद्दे लक्षात घेता व M/s. SYSTRA यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या सुधारीत निविदा संरेखन रेखाचित्र लक्षात घेता, तसेच प्राधिकरणाच्या मेट्रो शाखेचे अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व विविध सेवा वाहिन्यांचे प्रतिनिधी यांनी केलेल्या विनंतीचा विचार करून सदर मेट्रो मार्गात काही बदल करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने खालील बाबी निविदेत समाविष्ट करण्यात आल्या :-

- मेट्रो मार्ग ९ व मेट्रो मार्ग ७अ च्या एकूण लांबीत पुढील बदल करण्यात आले :-
  - उन्नत मेट्रो मार्ग – १५६ मीटर अधिक
  - भुयारी मेट्रो मार्ग – ३६६ मीटर अधिक
- मिरा-भाईंदर येथील लोकप्रतिनिधीची मागणी लक्षात घेता दोन संयुक्त उड्डाणपुलाचा समावेश करण्यात आला. यास्तव उड्डाणपुलांच्या लांबीत ३३४ मी. ची वाढ झाली.
- भूयारी मेट्रो स्थानकावर मे. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. (MIAL) यांचेकडून प्रस्तावित असलेल्या व्यापारी वाणिज्यिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जास्तीच्या संरचनात्मक घटकांचा समावेश करण्यात आला.
- भूयारी मेट्रो स्थानकासाठी आर्किटेक्चरल सजावटची तरतूद ही जागतिक दर्जाला अनुसरुन घेण्यात आली. आर्किटेक्चरल सजावटीचे काम हे Electrical & Mechanical (E&M) कामांसोबत होणे अपेक्षित असते जेणेकरुन सदरची कामे सहजतेने करता येतील. ही बाब लक्षात घेता E&M सर्विसेसच्या कामाची व्याप्ती सदर निविदेमध्ये निविदा प्रक्रिया सुरु असतांना अंतर्भूत करण्यात आली.

३.५ अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी पुढे असेही सांगितले की, वरीलप्रमाणे कामाच्या व्याप्तीत झालेले बदल लक्षात घेता, ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ मार्च, २०१९ पर्यंत वाढविण्यात आला. दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी लिफाफा 'अ' (निविदा किंमत, इसारा ठेव) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले. त्यात खालील चार (४) ई-निविदाकारांचे प्रस्ताव प्राप्त झाले :-

१. मे. हिंदुस्थान कंन्स्ट्रक्शन कं. लि.
२. मे. एफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.
३. मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.
४. मे. लार्सन अँड टुब्रो लि.

सदर मेट्रो मार्गाचे काम तांत्रिकरित्या जटील असल्यामुळे प्राप्त झालेल्या ई-निविदांची छाननी करण्याकरीता तज्ञांच्या आवश्यकतेच्या दृष्टिने मेट्रो मार्ग ७ व २ब करीता असलेले साधारण सल्लागार(General Consultant) M/s. Ayesa-Italferr-CEG-Ayesa India (AICA)Consortium यांची नेमणूक करण्यात आली होती. ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी M/s. AICA Consortium यांच्यामार्फत करण्यात येऊन अहवाल प्राधिकरणास दिनांक १२ एप्रिल, २०१९ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवाल अतिरिक्त महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीपुढे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी शिफारसीसाठी सादर करण्यात आला. निविदा समितीच्या शिफारसीनूसार निविदेच्या तांत्रिक बाबींची पूर्तता करणा-या प्राप्त निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) दिनांक ०३ मे, २०१९ रोजी उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदांची आर्थिक देकारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) | प्राप्त देकार (रु. कोटी) | % कमी/अधिक (-/+) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. हिंदुस्थान कंन्स्ट्रक्शन कं. लि. | १६३८.१३ | रु. २०६९.१३ | २६.३१% | तृतीय लघुत्तम |
| २ | मे. एफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | | रु. २१००.०५ | २८.२०% | चतूर्थ लघुत्तम |
| ३ | मे. लार्सन अँड टुब्रो लि. | | रु. २०६४.५ | २६.०३% | द्वितीय लघुत्तम |
| ४ | मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | | रु. २०२३.०५ | २३.५०% | प्रथम लघुत्तम |

३.६ अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांनी रु. २०२३.०५ कोटी रक्कमेचा लघुत्तम देकार सादर केला आहे. M/s AICA Consortium यांचा आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीस दिनांक ०६ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला. या बैठकीत प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये निविदा प्रक्रियेदरम्यान उन्नत मार्गाच्या लांबीत झालेली वाढ, भुयारी मार्गाच्या लांबीत झालेली वाढ, उड्डाणपुलांच्या लांबीत झालेली वाढ तसेच, भुयारी स्थानकासाठी विद्युत व यांत्रिकी सेवांचा समावेश इत्यादी कारणांमुळे व जून, २०१८ ते जानेवारी, २०१९ या काळातील भाववाढ लक्षात घेता प्रकल्पाचा सुधारीत अंदाजित खर्च रु. १८१३.१७ कोटी इतका आहे. लघुत्तम निविदा रु. २०२३.०५ कोटी ही सुधारीत खर्चापेक्षा रु. २०९.८८ कोटी म्हणजेच ११.५८% जास्त आहे. यास्तव लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी करण्यासाठी दिनांक ०६ जून, २०१९ रोजी बैठक बोलविण्यात आली. सदर बैठकीत लघुत्तम निविदाकाराने त्याच्या देकाराच्या समर्थनार्थ सविस्तर खुलासा सादर केला व देकारावर सुट देण्यास असमर्थतता दर्शविली. लघुत्तम निविदाकाराचा खुलासा लक्षात घेता, निविदा शिफारस समितीची दुसरी बैठक दिनांक १७ जून, २०१९ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीदरम्यान समितीने लघुत्तम निविदाकाराने सादर केलेल्या खुलासा संबंधी M/s. DMRC यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्याचा निर्णय घेतला. M/s. DMRC यांनी सविस्तर प्रकल्प अहवालातील दर हे भुयारी स्थानकावर करण्यात येणारा वाणिज्यिक विकास वगळता सर्वसमावेशक असल्याचे कळविले आहे. लघुत्तम निविदाकारा समवेत दिनांक ०६ जूलै, २०१९ रोजी वाटाघाटीसाठी पुन्हा बैठक बोलविण्यात आली. या बैठकीत वाटाघाटीअंती लघुत्तम निविदाकाराने त्याचा देकार रु. २०२३.०५ कोटी वरुन रु. १९९८.०० कोटी इतका कमी केला.

३.७ अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी पुढे असे सांगितले की, शासन निर्णय (सार्वजनिक बांधकाम विभाग) दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१८ नुसार प्रकल्पाचा खर्च हा निविदा स्विकृतीच्या दिनांकास प्रचलित असणा-या दरसूची प्रमाणे अद्ययावत करुन प्रकल्पाची सुधारीत किंमत ठरवली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचा जुन २०१९ रोजी पर्यंतची अद्ययावत किंमत व निविदेत समावेश नसलेला भुयारी स्थानकावरील वाणिज्यिक विकासाच्या कामाचा खर्च रु. १०.०० कोटी लक्षात घेता, प्रकल्पाचा एकुण सुधारीत अंदाजित खर्च रु.१८४९.७४ कोटी इतका होत आहे.

३.८ महानगर आयुक्त यांनी सुधारीत देकाराचे विश्लेषण करतांना सांगितले की, जून २०१९ च्या पातळीनुसार उन्नत मार्गाचा अंदाजित खर्च रु. १०४०.९४ कोटी इतका असून यासाठीचा सुधारीत देकार रु.१०७३.४४ कोटी (म्हणजेच ३.१२% अधिक) आहे. तसेच, भुयारी मार्गासाठीचा सुधारीत खर्च रु.४७४.२२ कोटी इतका असून सुधारीत देकार रु.४७४.००कोटी इतका आहे. भुयारी स्थानकाचा अंदाजित खर्च रु.२५०.१७ कोटी इतका असून सुधारीत देकार रु.३६८.१३ कोटी इतका आहे. हे लक्षात घेता उन्नत मार्ग व भुयारी मार्ग यांचे देकार सुधारीत खर्चाशी तुलना करण्याजोगे आहेत. मात्र भुयारी स्थानकाच्या किंमतीत व देकारात तफावत आढळल्याने सदर देकाराच्या तांत्रिक व आर्थिक बाबींचे योग्य व वस्तूनिष्ठ मुल्यांकन स्वतंत्र Third Party संस्थेकडून करुन घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे Indian Institute Technology, Mumbai यांना दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये अभिप्रायासाठी विनंती करण्यात आली होती. Indian Institute Technology, Mumbai यांनी दिनांक ३०.०८.२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार (१) प्रस्तावित मेट्रो मार्ग-७अ या भुयारी स्थानकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करताना मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांनी त्यांच्या टप्पा-३ मधील दिल्ली येथील भुयारी स्थानकांच्या कामांचा संदर्भ घेतलेला असल्याचे दिसते. तथापी, मेट्रो मार्ग-७अ भुयारी स्थानकाच्या कामांत प्रामुख्याने भुयारी स्थानकाची खोली ही सुमारे २८ ते ३० मी. असून सर्वसाधारण भुयारी स्थानकांच्या खोलीपेक्षा सुमारे २०% जास्त आहे. तसेच मेट्रो मार्ग-७अ स्थानकावर जमीन स्तरावर प्रस्तावित व्यावसायिक वाणिज्यिक बांधकामामुळे संरचनात्मक बाबींमध्ये होणारी वाढ, खोदकामासाठी सेकँट पाईल (Secant Pile) ची आवश्यकता, उतारांचे स्थिरिकरण या अतिरिक्त बाबींचा समावेश आहे. तसेच सदर स्थानकाची जागा ही अस्तित्वातील उन्नत मार्ग/उड्डाणपूल व नाला यांना संलग्न असल्याने कामाची जटीलता अधिक आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मेट्रो मार्ग-७अ भुयारी स्थानकाचा अंदाजित खर्च जास्त आहे. (२) सद्यस्थितीत मेट्रो मार्ग-३ या भुयारी मार्गिकेचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील भुयारी स्थानकाचे काम प्रगतीपथावर असून त्याची स्थानिक परिस्थिती, भू-तांत्रिक रचना इत्यादी बाबी या मेट्रो मार्ग-७अ बाबत सुद्धा सारख्याच असणार आहेत त्या अनुषंगाने मेट्रो मार्ग-३ स्थानकाचा संदर्भ मेट्रो मार्ग-७अ स्थानकाच्या अंदाजित खर्चाच्या तुलनेसाठी करणे संयुक्तिक व स्वाभाविक ठरते. (३) मेट्रो मार्ग -३ स्थानकाचा अंदाजित खर्च प्लॅटफॉर्म क्षेत्रफळावर प्रती चौ.मी. रु.६.८७ लक्ष एवढा असल्याचे दिसते. मेट्रो मार्ग-७अ च्या भुयारी स्थानकासाठी

मेट्रो मार्ग-३ स्थानकाचे बांधकाम प्रगतीपथावर असल्यामुळे तेथील साईट परिस्थितीची परिचितता (Familiarity) लक्षात घेता, तसेच दोन्ही स्थानकांसाठी मध्यवर्ती प्रवेश/निकास योजना ही संयुक्तीकरित्या वापरता येणार असल्याने साधारणपणे उपरोक्त नमूद केलेल्या क्षेत्रफळावरील किंमतीच्या १०% कमी किंमत मेट्रोमार्ग-७अ साठी घेणे उचीत होईल म्हणजे रु.६.१८३ लक्ष प्रती चौ.मी. त्यानुसार मेट्रो मार्ग-७अ भुयारी स्थानकाची वाजवी किंमत रु.३६१.१९ कोटी एवढी अपेक्षित असून त्यामध्ये २% पर्यंत फरक पडू शकतो असा निष्कर्ष IIT Mumbai यांनी काढला आहे. हे लक्षात घेता मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांचा भुयारी स्थानकाचा रु.३६८.२३ कोटी इतका देकार हा IIT Mumbai यांनी अंदाजित केलेल्या रु.३६१.१९ कोटी खर्चापेक्षा रु.७.०४ कोटी इतका जास्त आहे.

३.९ त्याअनुषंगाने, महानगर आयुक्त यांनी विषद केले की, प्राधिकरणामार्फत भूयारी मेट्रो मार्ग व भुयारी मेट्रो स्थानकांचे बांधकाम हे पहिल्यांदाच होत आहे. सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेले मेट्रो मार्ग ३ च्या स्थानकाचे काम लक्षात घेता IIT Mumbai यांचा अहवालातील विश्लेषण व त्यानुसार अंदाजित केलेल्या मेट्रो मार्ग ७अ च्या प्रस्तावित CSMIA T2 भूयारी स्थानकाची किंमत स्विकारणे संयुक्तीक ठरते. महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, जून, २०१९ पर्यंतची भाव वाढ लक्षात घेता, प्रकल्पाचा अद्ययावत अंदाजित खर्च रु. १८४९.७४ कोटी इतका आहे. लघुत्तम निविदाकाराचा सुधारीत देकार रु. १९९८.०० कोटी हा प्रकल्पाचा अद्ययावत अंदाजित खर्चापेक्षा ८.०१% अधिक आहे. IIT Mumbai यांनी भुमिगत स्थानकाची मूल्यांकन केलेली किंमत रु. ३६१.१९ कोटी गृहीत धरली तर प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १९६०.७६ कोटी एवढी असेल. सदर किंमतीच्या तुलनेत मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांचा रु. १९९८.०० कोटींचा देकार रु. ३७.२४ कोटी म्हणजे सुमारे १.८९% इतका जास्त आहे.

३.१० मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वरील विश्लेषणाच्या अनुषंगाने भविष्यातील प्रकल्प राबवितांना पुढील सुचना केल्या आहेत. (१) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पर्यंत होणारे प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदल, दरम्यान प्रकल्पाच्या किंमतीत होणारी भाव वाढ या सर्व बाबींचा विचार करुन प्रकल्पाच्या अद्ययावत किंमतीवर निविदा मागवाव्यात आणि निविदा प्रक्रिया सुरु असल्यास निविदाकारांना त्याबाबत वेळोवेळी अवगत करावी. (२) प्रकल्पाच्या अद्ययावत किंमतीस आवश्यक असल्यास सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया पार पाडावी. (३) प्रकल्पासाठी नेमलेल्या सल्लागारांनी

दिलेल्या अहवालांच्या आधारे प्रकल्प किंमत ठरविताना प्रत्यक्ष भू-तांत्रिक परिक्षण, संरचनात्मक तपशिल, बाजारभाव इत्यादी बाबींचा अभ्यास करुन त्यानुसार प्रकल्पाची अंदाजित किंमत निश्चित करावी.

३.११ वरील प्रस्तावावर सखोल चर्चेअंती कार्यकारी समितीने मेट्रो मार्ग ९ व मेट्रो मार्ग ७अ यांच्या निविदा प्रक्रिये दरम्यान व्याप्तीत झालेली वाढ, IIT Mumbai यांनी भूमिगत स्थानकाच्या अंदाजित किंमती विषयी केलेले विश्लेषण, सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेले मेट्रो मार्ग ३ स्थानकाचे काम, तसेच जून २०१९ पर्यंतची भाववाढ लक्षात घेऊन प्रकल्पाची अद्ययावत किंमत यांचा सारासार विचार करुन मेट्रो मार्ग ९ व मेट्रो मार्ग ७ व त्यावरील स्थानके या प्रकल्पाची लघुत्तम निविदा किंमत रु. १९९८.०० कोटी स्विकारण्यास मान्यता दिली.

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो मार्ग-९ (दहिसर ते मिरा भाईंदर) व मेट्रो मार्ग ७अ (अंधेरी (पूर्व) ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) यासाठी मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत रु. १८४९.७४ कोटीपेक्षा ८.०१% अधिक म्हणजे रु. १९९८.०० कोटी (सर्व करांसहित) एवढा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>बाब क्र.४ : मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी मेट्रो भवन, परिचालन नियंत्रण केंद्र (OCC) व मेट्रो प्रशिक्षण केंद्र या प्रकल्पाच्या बांधकामासाठी ई-निविदांना मंजुरी देणेबाबत.</u>**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४७ व्या बैठकीत मेट्रो भवन, OCC व मेट्रो प्रशिक्षण केंद्र या इमारतीच्या बांधकामासाठी रु. १०३२.५४ कोटी एवढ्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुंबई मेट्रो रेल प्रोजेक्टच्या १४ मेट्रो मार्गिकांच्या ३३७.१० कि.मी. मेट्रो मार्गासाठी एका ठिकाणांहून परिचालन करण्यासाठी परिचालन नियंत्रण केंद्र (क्षेत्रफळ सुमारे २४२९३ चौ.मी.)प्रस्तावित केलेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची मेट्रो प्रशिक्षण संस्था (क्षेत्रफळ सुमारे ९६२४ चौ. मी.), विविध Simulators व मेट्रो निगडीत तांत्रिक कार्यालये (क्षेत्रफळ सुमारे ८०१७१ चौ. मी.) आरे, गोरेगाव वसाहत येथे प्रस्तावित आहे व मेट्रो भवन या इमारतीत एका ठिकाणांहून कार्यरत राहणार आहेत. मुंबई मेट्रो मार्गांची व्याप्ती पाहता १४ मेट्रो मार्गिकांचे परिचालन आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान व उपकरणे वापरून एकाच परिचालन नियंत्रण केंद्रामधून होणे हे जागतिक स्तरावर सर्वोत्तमापैकी एक असणार आहे. सदर मेट्रो भवनाचे बांधकामाचे प्रारुप आराखड्यानुसार सांगाड्याचे संकल्पचित्र व बांधकामाची तसेच फिनिशिंग आयटमच्या (Including Electrical, Mechanical, plumbing, interiors and furniture) दरानुसार जागतिक स्तराच्या ई-निविदेद्वारे कंत्राटदाराची नेमणूक करण्याचे नियोजित केले.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सद्य:स्थितीत अंमलबजावणी होत असलेले मेट्रो मार्गांचे पुर्णत्व नजीकच्या काळात अपेक्षित असल्याने त्या अनुषंगाने मेट्रो भवन इमारतीचे बांधकाम देखील होण्याची नितांत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने, प्राधिकरणाने सदर मेट्रो भवन प्रकल्पाच्या कामाकरिता ई-निविदा मागविण्यासाठी"टाईम्स ग्रुप" च्या विविध इंग्रजी, मराठी व हिंदी दैनिक वृत्तपत्रात दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली व ती प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली. त्यानुसार निविदा पूर्व बैठक दिनांक ११ मार्च, २०१९ रोजी घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै, २०१९ अशी होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा लिफाफा 'अ' (निविदा किंमत)

व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) दिनांक०२ ऑगस्ट, २०१९रोजी दुपारी ०३.०० वाजता निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदाप्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. टाटा प्रोजेक्ट्स लि. |
| २ | मे. लार्सन अँड टुब्रो लि. |
| ३ | मे. एन.सी.सी. लि. |

४.३ सदर प्रस्तावाबाबत अधीक माहिती देताना अति. महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मेट्रो भवन प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने प्राधिकरणातर्फे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून M/s. Epicons Consultant Pvt. Ltd, Mumbai & RALYS Services Consultant, Bangalore दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या कार्यकारी समितीच्या २६२ व्या बैठकीतील मान्यतेनुसार नेमणूक करण्यात आली आहे. मेट्रो भवन प्रकल्पाच्या प्राप्त झालेल्या निविदांची तांत्रिक छाननी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मार्फत करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केलेला तांत्रिक छाननी अहवाल अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीस दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजी शिफारशीसाठी सादर करण्यात आला. सदर अहवालानूसार प्राप्त झालेले ३ ई-निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरते. निविदा शिफारस समितीच्या शिफारसीनुसार दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ रोजी सर्व निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदांची आर्थिक देकारांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु.कोटी) | प्राप्त देकार (रु.कोटी) | % अधिक (+) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. टाटा प्रोजेक्ट्स लि. | ९२४.१३ | १२२९.०२ | ३२.९९ | |
| २ | मे. लार्सन अँड टुब्रो लि. | | १२१६.०० | ३१.५८ | |
| ३ | मे. एन.सी.सी. लि. | | **११६२.७४** | **२५.८२** | लघुत्तम |

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. एन.सी.सी. लि. यांनी सादर केलेला लघुत्तम देकार हा निविदा रक्कमेच्या २५.८२% अधिक असल्यामुळे निविदाकार मे. एन.सी.सी. लि. यांचेकडून त्याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. मे. एन.सी.सी. लि. यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ व दिनांक ३० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये

त्यांच्या देकाराबाबत स्पष्टीकरण सादर केले. सदर स्पष्टीकरणामध्ये मे. एन.एन.सी.लि. यांनी सादर केलेला देकार हा मुख्यत्वे ज्या बाबींमुळे अंदाजपत्रकीय किंमतींपेक्षा अधिक आहे त्याबाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

अ) इमारतीची संरचनात्मक बाबी जसे, सविस्तर भु-तांत्रिक चाचण्या, ईमारत अति उंच इमारतीत मोडत असल्याने त्या अनुषंगाने येणा-या भुकंपरोधक व विंड टनेल ॲनॅलिसीस व त्याबाबतच्या चाचण्या, इमारतीत अपेक्षित असणारा अवजड यंत्राचा वापर, विविध परवानग्या इत्यादी बाबींमुळे वाढणारा खर्च.

ब) इमारतीच्या बांधकामासाठी विशेष कुशल कामगार, त्यांच्यासाठी आवश्यक असलेले कामगार छावनी, बांधकामासाठी फेब्रीकेशन यार्ड, बॅचिंग प्लॅन्ट, इत्यांदीसाठी आवश्यक असलेली अतिरिक्त जागा व त्याअनुषंगाने येणारा अधिकचा खर्च.

क) इमारतीच्या मजल्यांची उंची ही सारखी नसल्याने त्यासाठी आवश्यक असणा-या पुरक बांधकाम साहित्यात वारंवार बदल होणार आहेत. तसेच, जमीनीखालील भागात ब-याच प्रमाणात इमारतीच्या पायासाठी व बेसमेंटसाठी खोलीकरण करण्यात येणार असल्याने त्यासाठी आवश्यक असलेले पायलिंग व भुस्थिरीकरणाशी निगडीत बाबींमुळे वाढणारा खर्च.

४.५ याबाबत पुढे महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडून वरील स्पष्टीकरणाबाबत अभिप्राय मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने निविदाकाराने सादर केलेले स्पष्टीकरणाचे तपशिलवार विश्लेषण करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी असे निदर्शनास आणले की, लघुत्तम निविदाकार मे. एन.सी.सी. लि. यांनी सादर केलेला देकार हा प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश मुळ अंदाजपत्रकात दिसुन येत नसल्याने अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा अधिक आहे.

अ) इमारतीच्या संरचनेचा खर्च (Design Charges), विशेष कामगारांवर होणारा जास्तीचा खर्च, कामगार छावनी, बांधकाम फॅब्रीकेशन यार्ड व बॅचींग प्लांट इत्यादीसाठी आवश्यक असणाऱ्या जागेचा अधिकचा खर्च.

ब) ईमारत अती उंच श्रेणीत मोडत असल्याने व ईमारतीच्या मजल्याची उंची मेट्रो भवनाच्या तांत्रिक आवश्यकतेनुसार बदलत असल्याने, पूरक बांधकाम साहित्यात होणारे बदल इत्यादी कारणामुळे होणारे बदल.

..१३/-

क) जमीनीखालील भागात ब-याच प्रमाणात इमारतीच्या पायासाठी व बेसमेंटसाठी खोलीकरण करण्यात येणार असल्याने त्यासाठी आवश्यक असलेले पायलिंग व भु-स्थिरीकरणाशी निगडीत बाबींमुळे वाढणारा खर्च. वरील बाबींमुळे एकूण अंदाजपत्रकीय किंमत रु.१०७६.९८ कोटी एवढी योग्य असल्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी कळविले आहे. सदर रक्कम मुळ अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा सुमारे १६.५४% अधिक आहे.

४.६ याबाबत महानगर आयुक्त यांनी अधिक माहिती देतांना असे सांगितले की,प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यामार्फत सादर करण्यात आलेले वरील अभिप्राय अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आले. वरील सर्व बाबींवर निविदा शिफारस समितीने सविस्तर चर्चा केली. यासंदर्भात महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ०१ नोव्हेंबर २०१८ व MoHUA च्या दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ च्या अहवालानुसार प्रकल्पाचा खर्च हा निविदा स्विकृतीच्या दिनांकास प्रचलित असणाऱ्या दरसूची प्रमाणे अद्ययावत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचा खर्च ऑगस्ट २०१९ रोजीच्या पातळीनुसार अद्यवात केल्यानंतर प्रकल्पाची किंमत रु.९४७.२३ कोटी एवढी आहे. तद्नंतर लघुत्तम निविदाकारास दिनांक ०४ सप्टेंबर, २०१९ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. वाटाघाटीनंतर लघुत्तम निविदाकार मे. एन.सी.सी.लि. यांनी रु.१०८९ कोटी (सर्व करांसहित) एवढा सुधारीत आर्थिक देकार सादर केला. सदर सुधारीत देकार हा प्रकल्पाच्या अद्ययावत किंमतीपेक्षा १४.९६% अधिक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या अहवालाचे अवलोकन करुन लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला रु.१०८९ कोटीचा (सर्व करांसहित) सुधारीत आर्थिक देकार स्विकारण्यास निविदा शिफारस समितीने शिफारस केली आहे.

४.७ याबाबत मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, अंदाजपत्रक बनवितांना Heavy Machineries, Tower Cranes, कामगार छावनी, Fabrication yard, Baching plant साठी आवश्यक असणा-या बाबी विचारात घेतल्या की नाही ही विचारणा केली असता त्यावर संचालक (प्रकल्प) मेट्रो यांनी असे सांगितले की, या अंदाजपत्रकात वरील गोष्टींसाठी लागणारा खर्च अंर्तभूत केलेला नाही. तसेच मेट्रो भवन या इमारतीची उंची सुमारे १५४ मी. इतकी असल्याने, सदर ईमारत मेट्रो परिचालनाच्या दृष्टीने

..१४/-

अत्यंत महत्वाची असल्याने इमारतीची गणना भूकंप प्रवण क्षेत्र ४ (Zone IV) मध्ये केली असल्याने आवश्यक विशेष संरचना, इमारत अतिउंच श्रेणीत येत असल्याने त्यासाठी आवश्यक असे विन्ड टनल ॲनलिसिस इत्यादी बाबी कंत्राटदाराने करणे अपेक्षित आहे. यावर अधिक खुलासा करता संचालक (प्रकल्प) यांनी असे सांगितले की, सदर अंदाजपत्रक तयार करतांना २०१८ ची दरसूचीचा आधार घेतलेला आहे. तसेच ज्याबाबींचे दरसूचीत दर उपलब्ध नाही तेथे बाजारभावाप्रमाणे दर घेण्यात आले आहे. परंतू Heavy Machineries, Tower Cranes, कामगार छावनी, Fabrication yard, Batching plant इत्यादीची तरतूद दरसूची मध्ये उपलब्ध नाही.

४.८ याबाबत पुढे चर्चा करताना, अपर मुख्य सचिव, नगर विकास (१) व कार्यकारी समितीच्या सदस्यांनी मेट्रो भवन आरे कॉलनीमध्ये नियोजित असल्याने इमारतीच्या उंचीबाबत भूमिका विचारली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्टीकरण दिले की, सदर इमारतीचे Foot print हे कमीत कमी असून या इमारतीमुळे बाधित होणाऱ्या वृक्षांचे पर्यावरण संरक्षणासाठी जास्तीत जास्त जतन करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच कार्यकारी समितीच्या सदस्यांनी प्रस्तावित मेट्रो भवनाच्या अंमलबजावणी दरम्यान बांधकामात क्षेत्रफळ आवश्यकतेनुसार कमी करण्याचा विचार करावा अशी सुचना केली.

४.९ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, यापुढे सविस्तर प्रकल्प अहवाल ते निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत, कामाच्या व्याप्तीतील बदलामुळे अंदाजपत्रकातकाही बदल होत असेल तर, तसेच ज्या गोष्टी दरसूची मध्ये समाविष्ट नाही असे गोष्टींचे Rate समाविष्ट करुन त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करावा व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम सर्व निविदाकारांना कळविण्यात यावी.

**निर्णय :- सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो भवन, परिचालन नियंत्रण केंद्र (OCC) व मेट्रो प्रशिक्षण केंद्र

या प्रकल्पाच्या बांधकामासाठी मे. एन.एन.सी.लि. यांचा सुधारीत अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा रु. ९४७.२३ कोटीपेक्षा १४.९६% अधिक म्हणजे रु. १०८९ कोटीचा (सर्व करांसहित) एवढा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यकती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांनायाद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. ५:** **विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत "माणकोली मोटागांव जोडरस्ता" या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत दि. २७/०६/२०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीच्या ठराव क्र. १३०४ अन्वये कार्यकारी समितीने २४१ व्या बैठकीमध्ये शिफारस केलेल्या रस्त्याच्या व उड्डाणपुलाच्या रु. ३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये रु. २४५ कोटी इतक्या किंमतीच्या "माणकोली मोटागाव रस्त्यावरील मोटागाव येथे उल्हास खाडीवर सहा पदरी पुल बांधणे व रस्त्याचे बांधकाम करणे" या कामांचा समावेश आहे. सदर काम हाती घेताना प्रत्यक्ष जागेचा ताबा नसल्यामुळे हे काम दोन भागामध्ये विभागण्यात आले. भाग-१ मध्ये उल्हास खाडीवर सहा पदरी पुलाचे (पोहोच रस्त्यासह) बांधकाम करणे व भाग-२ मध्ये उल्हास खाडीवरील पुलापासून ते राज्य मार्ग-३ ला माणकोली येथे जोडणा-या रस्त्याचे बांधकाम करणे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भाग-१ च्या कामामध्ये खाडीपुलाची लांबी १.१२ कि.मी. (पोहोच मार्गासह) व अंदाजित किंमत रु. १९० कोटी एवढी होती. प्राधिकरणाने कार्यकारी समितीच्या २४७ व्या बैठकीमध्ये मान्यता घेऊन सदर कामाचा कार्यादेश दि. १४ मार्च, २०१६ रोजी मे. जे.कुमार - सुप्रिम (संयुक्त उपक्रम) यांना दिला. सद्य:सिथतीत पुलाचे काम प्रगतीपथावर आहे.

..१६/-

५.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्त प्रशासकीय मान्यतेमध्ये भाग-२ मधील रस्त्याच्या कामाची किंमत रु. ५५ कोटी इतकी होती व रस्त्याची लांबी २.५ कि.मी. इतकी होती. सदर काम सुरु होणेकरीता भूसंपादनाची कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु करण्यात आली होती. परंतु सदर भूसंपादनास वेळोवेळी प्रकल्प बाधितामार्फत अडथळा निर्माण करण्यात येत होता.

५.४ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मा. खासदार श्री. कपिल पाटील यांनी मौ. माणकोली येथील ग्रामस्थांच्या वतीने मौ. माणकोली गावामधून जाणा-या सदर रस्त्याच्या आखणीमुळे मौ. माणकोली गावठाण व त्यालगतची अस्तित्वातील बांधकामे बाधित होत असल्याने सदर रस्त्याच्या आखणीमध्ये बदल करण्याबाबत दिनांक २३ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये प्राधिकरणास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या आखणीला मौ. माणकोली गावाच्या पूर्वेकडे वळवून पुढे मौ. दापोडे येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ (NH-३) ला जोडण्याचे प्रस्तावित केले.

५.५ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने नियोजनबध्द अभ्यास करुन रस्त्याच्या नवीन आखणीस प्राधिकरणाच्या दि. १३ जुलै, २०१७ रोजीच्या १४३ व्या बैठकीमध्ये मान्यता घेतली. सदर नवीन आखणीप्रमाणे संयुक्त मोजणी झाल्यानंतर जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत प्रकल्पासाठी लागणा-या जागेच्या भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली. सद्य:स्थितीत प्रकल्प बाधित जमिनीचे मूल्यांकन पूर्ण झाले असून नवीन भूसंपादन कायद्यान्वये जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच, प्राधिकरणाच्या दि. २७/०२/२०१९ रोजी झालेल्या १४७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. १४९९ अन्वये विस्तारीत नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत डोंबिवली व भिवंडी शहरांना जोडणा-या प्रस्तावित माणकोली-मोटांगाव रस्त्याच्या (लांबी -३.३०कि.मी.) कामाची सुधारीत प्रशासकीय किंमत रु. १६०.९८ कोटी (भूसंपादनासहीत) रक्कमेस मान्यता देण्यात आली.

५.६ त्या सदर कामाचा सुसाध्यता अहवाल, अंदाजपत्रक, निविदा मागविणे इ. बाबींसाठी मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरींग कंन्सल्टंट यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागाराने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर रु. ८९.८४ कोटी (वस्तु व सेवाकरासहीत) इतक्या अंदाजित किंमतीच्या विषयांकित कामाकरीता ब-१ (टक्केवारी) पद्धतीची ई-निविदा (लघुत्तम) प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच मराठी दैनिक (प्रहार)

व इंग्रजी दैनिक (DNA) वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दि. २९/०८/२०१९ होता, असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

५.७ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सविस्तर निविदा सुचनेमध्ये विहित केलेल्या पात्रता निकषास अनुसरुन लिफाफा **"अ"** व **"ब"** मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी मे. मोनार्च, सल्लागारामार्फत करण्यात आली व त्यानुसार पात्र ठरलेल्या ६ निविदाकारांचे आर्थिक देकार असलेले लिफाफे **"क"** दि. ०३/०९/२०१९ रोजी उघडण्यात आले त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :

| अनु क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु) | टक्केवारी दर निविदेमधील अंदाजित खर्चाच्या तुलनेत | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ८०,००,०८,५८३/- | (-)१०.९५% | तृतीय लघुत्तम |
| २. | मे.आर.के.मदानी अॅन्ड कं. | ८२,१४,७९,८९७/- | (-)०८.५६% | चतुर्थ लघुत्तम |
| ३. | मे.रेलकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ८९,७५,७२,७९६/- | (-)०.०९% | सहावा लघुत्तम |
| ४. | **मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.** | **७४,४१,२९,२६४/-** | **(-)१७.१७%** | **प्रथम लघुत्तम** |
| ५. | मे. लॅंडमार्क कोरपोरेशन प्रा.लि. | ८४,०८,८४,९३४/- | (-)०६.४०% | पाचवा लघुत्तम |
| ६. | मे. आर.ई.इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. | ७९,६०,५५,७०५/- | (-)११.३९% | द्वितीय लघुत्तम |

प्राप्त देकारात मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचा रु ७४,४१,२९,२६४/-इतक्या किंमतीचा आर्थिक देकार निविदेमध्ये नमूद केलेल्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) १७.१७% या दराने कमी असलेला प्रथम लघुत्तम आहे.

५.८ महानगर आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा समिती प्रक्रिया बाबत माहिती देताना असे सांगितले की, सदरच्या कामासाठी मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा आर्थिक देकार रु. ७४,४१,२९,२६४/- इतका लघुत्तम निविदा व स्पर्धात्मक निविदा लक्षात घेता मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचा आर्थिक देकार रु. ७४,४१,२९,२६४/- अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-)१७.१७% या दराने कमी असलेला प्रथम लघुत्तम निविदा कार्यकारी समितीकडे मुंजरी करीता सादर करण्याची शिफारस केली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

५.९ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी सदर कामाच्या कमी दराविषयी विचारणा केली असता लघुत्तम निविदा काराने त्यांच्या निविदेच्या रक्कमेबाबत खालील प्रमाणे खुलासा केला असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले :-

१. सदर कामामध्ये खोदकाम व भरणीकाम यांची अंदाजित किंमत रु.८ कोटी इतकी

आहे. सदर कामाकरिता लागणारी यंत्रसामुग्रीची किंमत ही अंदाजे रु. ४ - ५ कोटी इतकी आहे. या करिता पुरेशी यंत्रसामुग्री स्वत:च्या मालकीची असल्याने अंदाजे रु.३ कोटींची बचत होणार आहे.

२. सदर कामामध्ये भराव प्रतिबंधक भिंत व त्या संलग्न कामाची किंमत रु. १५ कोटी इतकी आहे. याकरीता लागणारी कुशल कामगार उपलब्ध आहे तसेच कॉक्रीट प्लान्ट स्वत:च्या मालकीचा असल्याने अंदाजे रु. ५ कोटींची बचत होणार आहे.

३. उर्वरीत ६६ कोटींच्या रस्त्याच्या कामामध्ये कंपनीकडे पुरेसे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध असल्याने वरखड खर्चामध्ये अंदाजे ७ कोटींची बचत होणार आहे.

असे एकूण १५ ते १७% ची बचत विचारात घेऊन १७.१७% कमी किंमतीचा देकार कंत्राटदाराने सादर केलेला आहे.

वरील कारणांची पडताळणी करुन सल्लागार मे. मोनार्च यांनी कंत्राटदाराचा १७.१७% कमी किंमतीचा देकार मान्य करण्याची शिफारस केली. सदर शिफारस निविदा समितीने मान्य करुन मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा प्रथम लघुत्तम देकार प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात यावा असे आदेश दिले.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करता, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत "माणकोली मोटागांव जोडरस्ता" या कामासाठी मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा लघुत्तम निविदा देकार रु ७४,४१,२९,२६४/- कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमती पेक्षा (-) १७.१७% कमी रक्कमेच्या अंतिम आर्थिक देकारास मान्यता प्रदान करणे तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे असा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरु करण्यास सुद्धा मान्यता देण्यात यावी.

कार्यकारी समितीस विनंती करण्यात येते की, वरील प्रस्ताव मान्य असल्यास पुढील ठराव बदलाशिवाय किंवा बदलासह मंजुर करण्यात यावा.

...१९/-

**निर्णय :-** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३८४ :**

असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांच्या वापर करुन कार्यकारी समिती विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत "माणकोली मोटागांव जोडरस्ता" या कामासाठी मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा लघुत्तम आर्थिक देकार रु. ७४,४१,२९,२६४/- कोटीस मान्यता देत आहे तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता काम तात्काळ सुरु करण्यास सुद्धा मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ६:** **प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१९ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१९ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :-** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**पटल बाब क्र. १:** **मेट्रो मार्ग-४अ या मेट्रो मार्गाचा उन्नत मार्ग व दोन स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.CA ५४ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी या बैठकीत कासारवडवली-गायमुख (मेट्रो मार्ग-४अ) या प्रकल्पाच्या स्थापत्य कामाकरीता कंत्राटदाराच्या नियुक्तीकरीता पटल बाब म्हणून सादर

करावयाचे आहे असे नमूद केले.मा. मुख्य सचिव, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या संबंधी चर्चा करताना असे निर्देश दिले की, उपरोक्त बाब बैठकीच्या कार्यसूचीवर नसल्यामुळे सदरची बाब टिप्पणी पटल बाब म्हणून विचारात न घेता कार्यकारी समितीच्या आगामी २६४व्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात यावी.

यास्तव कार्यकारी समितीची आगामी बैठकी सोमवार, दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात यावी. तसेच, आजच्या आजच्या बैठकीस उपस्थित सदस्यांना देण्यात यावी व बाकी सर्व सदस्यांना निर्गमित करण्यात यावेत.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********